नेकी सुंदर चारित्र्याचे दुसरे नाव आहे, आणी पाप ते आहेत, जे तुमच्या मनात खटकतात, आणी तुम्हाला जे आवडत नाही, की ईतरांना ते माहीत व्हावे

हजरत नवास बिन समआन अल्लाह प्रसन्न असो त्यांच्यावर] कथन करतात की, प्रेषितांनी
[सलामती असो त्यांच्यावर] फरमाविले आहे की: <>. हजरत वासबा बिन मआबद अल्लाह राजी असो त्यांच्याशी सांगतात की:मी प्रेषितांकडे सलामती असो त्यांच्यावर हजर झालो असता, त्यांनी फरमावीले की:<>, मी आवर्जून म्हणालो: होय, त्यावर प्रेषित सलामती असो त्यांच्यावर म्हणाले:<>.
[صحيح] [الحديث الأول: رواه مسلم، والحديث الثاني: رواه أحمد والدارمي]

प्रेषित मुहम्मदांनी सलामती असो त्यांच्यावर सदगुण व दुर्गुणा बाबतीत सखोल माहिती दिली आहे, त्यांनी सांगितले की:नेकी [अलबिर] ची सर्वात मोठी ओळख अल्लाह सोबत सुंदर चारित्र्य आहे, अल्लाह सोबत सुंदर चारित्र्य म्हणजे [तकवा] ईशभिरुता, व ईतर मानवा सोबत सुंदर आचरण चा अर्थ आहे, लोकांच्या त्रासावर संयम ठेवणे, कमी रागावणे, आनंदी स्वभाव, नम्रपणे बोलचाल करणे, दुसऱ्या वर परोपकारी वृत्ती व उदारता, म्रुद स्वभावही, सुंदर व्यवहार व मैत्री जपणारा, प्रेषितांनी सलामती असो त्यांच्यावर फरमाविले की:नेकी [पुण्यता] ती आहे, ज्यावर मन व ह्रदय आनंदी व समाधानी होते. आणी पाप व दुष्कर्म [अल ईस्म] ते आहेत, जो मनात खटकतो, व ह्रदयाला विचलित व बेचैन करतो, मन ग्वाही देते की, आपली चुक आहे, आणी ते क्रुत्य असे आहे की माणसाला वाटते की ईतरांनी ते पाहु नये, कारण माणसाच्या अंतरंगाची ईच्छा असते की लोकांनी फक्त त्याच्या चांगल्या व सत्कर्मांनाच बघावे, एकंदरीत सत्य आहे की, जे कर्म माणुस ईतरांपासुन लपवतो ते बहुतांशी ते पाप असतात, जर लोकांनी तुम्हाला कर्म बरोबर असण्याचे प्रमाण जरी दिले तरीही तुमच्या मनात त्याबाबत शंका असेल, तर त्यावर फतवा किंवा धर्मादेश विचारु नये, जर तुमची शंका एकदम अचुक असेल व [मुफ्ती] विद्वानांनी चुकीने आदेश दिला असेल, परंतु जर विद्वानांनी दिलेला [फतवा] निर्णय एकदम मजबुत प्रमाणांवर आधारित असेल तर मनाच्या विरुद्ध जाऊन त्या निर्णया कडे रुजु करणे गरजेचे आहे.

http://sunnah.global/hadeeth/mr/show/66540